
पोम्पेई...

जिवंत गाडले गेलेले शहर



एडिथ कुन्हार्ट

चित्र: माइकल ईगल

मराठी: अश्विनी बर्वे

पोम्पेई...

जिवंत गाडले गेलेले शहर!



एडिथ कुन्हार्ट

चित्र: माइकल ईगल

1.

झोपलेला राक्षस


एके काळी पोम्पेई नावाचे एक शहर होते. शहराच्या जवळ वेसुवियस नावाचा एक पहाड़ होता.

पोम्पेईच्या लोकांना पहाडाजवळ राहणे आवडत होते. ती द्राक्षे लावण्यासाठी एक चांगली जागा होती. मेंढ्या पाळण्यासाठी सुद्धा ती एक चांगली जागा होती. आणि त्या ठिकाणी खूप शांतता होती.



पण त्या पहाडात खरोखर एक भयंकर ज्वालामुखी होता. तो एक झोपलेल्या राक्षसासारखा होता. जर राक्षस जागा झाला, तर तो हे शहर नष्ट करू शकतो.

लोकांना संकटाची माहीती होती का? नाही लोकांना त्या संकटाचा बिलकुल अंदाज नव्हता.




ज्वालामुखीचा एक विशेष प्रकारचा पर्वत असतो. त्याच्या टोकावर एक छेद असतो.

एक दिवस - जवळपास दोन हजार वर्षांपूर्वी - वेसुवियसच्या आत काहीतरी होत होते.

खूप खोलवर तो खूप खूप गरम होता. त्याच्यात एवढी उष्णता होती की आतले खडक पघळू लागले होते. जसे हे खडक विरघळू लागले, एक वायू तयार झाला आणि तो वायू त्वरित बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागला.

वायू आणि विरघळणारे खडक एकत्र झाले. ते मिश्रण गरम आणि उकळणारे होते. वायू, विसुवियसच्या आतून विरघळलेल्या खडकांना वर ढकलत होता.

विरघळलेले खडक पहाडाच्या टोकावर असलेल्या छेदातून बाहेर विस्फोट करणारच होते.




दिवासाची सुरुवात तशीच झाली जशी ती नेहमी होत असे. सूर्य गुलाबी रंगाचा होता. लोक पोम्पेई शहरात विकण्यासाठी वस्तू घेऊन येऊ लागले होते.

मच्छिमार मासे आणत होते. फेरीवाले खरबूज आणि गवताच्या टोप्या आणत होते.



शेतकरी भाज्या घेऊन येत होते. धनगर मेंढ्या आणत होते. गाड्या फाटकामधून येऊन शहरात येत होत्या.



रस्त्यावरच्या गाड्यांच्या आवाजामुळे घरातील लोकांना उठवले. सगळ्यात मोठ्या घरांमध्ये राहणाऱ्या एका घरातला परिवार खूप लवकर कामात व्यग्र झाला.



आई अंगणात प्रार्थना करायला गेली. तिने देवाच्या मूर्तीला कधी फुले वाहिली.

वडील कपडे घालायला गेले. त्यासाठी गुलामाने त्यांना मदत केली.




मुले खेळत होती.
ती आनंदात होती की उन्हाळ्याचे दिवस होते.



स्वयंपाकघरात गुलाम नाष्टा तयार करत होते.

घरात कोणालाच याचा काहीच अंदाज नव्हता की काहीतरी भयानक होणार आहे.



नाष्टा केल्यावर मुलं बाहेर गेली. रस्त्यावर गर्दी होती. दुकानात लोक काम करत होते. बेकरीवाला पाव तयार करण्यात मग्न होते, विणकर लोकरीचे कपडे विणण्यात मग्न होते, कुंभार मातीची भांडी तयार करण्यात व्यग्र होते.



गुलाम लोक एका फवाऱ्याच्या साहय्याने पाणी भरत होते. एक संगीतकर बासरी वाजवत होता.

रस्त्यावर कोणालाच माहीत नव्हते की काही होणार आहे.



स्नानागृहात त्या मोठ्या घरातले वडील पण होते. तुलाम त्यांच्या पाठीला तेलमालिश करत होते.

स्नानागृहात कोणालाच माहीत नव्हते की काही भयानक होणार होते.


सकाळी उशिरापर्यंत काही पुरुष स्नानगृहात होते. ते चांगला वेळ घालवत होते. काही पुरुष चेंडू खेळत होते. काही पुरुष वाफेच्या खोलीत गप्पा मारत होते. इतर लोक गरम पाण्याच्या तळ्यात अंघोळ करत होते.





दुपारपर्यंत शहरातील सभेच्या ठिकाण लोकांनी खचाखच भरलेले होते.

काही लोक खरेदी करण्यासाठी वस्तू शोधत होते. काही लोक आपल्या मित्रांशी बोलत होते. नवीन कायदा तयार करण्यासाठी कायदेतज्ज्ञ चर्चा करत होते. पर्यटक सुंदर इमारती न्याहाळत होते.



मोठ्या घरातली आई मंदिरात प्रार्थना करत होती.

शहरातील सभागृहात कोणालाच माहीत नव्हते की काही भयानक होणार आहे.



२ .


राक्षस जागा झाला

अचानक ज़मीन कापू लागली. पोम्पेईतील सर्व घरे हळू लागले. राक्षस जागा होत होता.





तेव्हाच एक भयानक कर्कश आवाज झाला. वेसुवियसचे शिखर उडून गेले. धूळ आणि राखेचा एक मोठा ढग हवेत उडाला.





सगळे ओरडू लागले.

मोठ मोठे ढग बघण्यासाठी लोक आपल्या घराच्या बाहेर निघाले. दुकानदार सुद्धा आपल्या दुकानातून बाहेर आले.

बेकरीवाले आपले पाव विसरून गेले. शेतकरी आपली फळे आणि भाज्या विसरून गेले. आणि कायदे तज्ञ नवीन कायद्याच्या बाबत विसरून गेले.

ढग सतत मोठा होत होता.




ढगात सूर्य लपला होता. अंधार झाला होता. पोम्पेईमधल्या लोकांवर छोटे छोटे गरम खडे पडू लागले.

काही लोकांनी डोके झाकण्यासाठी उश्या उचलल्या. अनेक लोक आपल्या घरात लपले.

प्रत्येकजण पळत होता. लोक धक्का बुक्की करत होते आणि ओरडत होते. काही लोक पळून जाण्यासाठी शहराच्या फाटकाकडे पळत होते. इतर लोक आपले दागदागिने आणि आपल्या घरातील सोन्याच्या वस्तूंची सुरक्षा करण्यासाठी आपल्या घरात घुसले.

काही लोक प्रार्थना करण्यासाठी मंदिरात गेले. देव त्यांना वाचवू शकणार होता का?







दिवस, रात्रीसारखा अंधारलेला झाला. हवेत भयानक दुर्गंध भरला होता. तो दुर्गंध सडक्या अंड्या सारखा होता.

लोक समुद्राकडे पळू लागले. काही लोकांनी रस्ता उजळण्यासाठी आपल्या हातात मशाल पकडली होती.

समुद्राला उधाण आले होते. समुद्राच्या किनाऱ्यावर मोठ मोठ्या लाटा आदळत होत्या. मासे वाळूत तडफडत होते.

मोठ्या घरातला परिवार नावेत चढू शकले, ते पळण्यात सफल झाले होते..





जेव्हा पोम्पेईवर मातीचे कण, खडे पडू लागले तेव्हा त्यातून अनेक लोक वाचू शकले नाही. ते खड्यांच्या, दगडांच्या खाली गाडले गेले.

जेव्हा ज्वालामुखीतून गरम राख निघू लागली. राख लोकांच्या अंगावर पडली. राख एवढी गरम होती की लोकांचे केस जळू लागले.

रस्त्यावरच्या काही लोकांनी स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला. ते कोपऱ्यात किंवा भिंतीच्या मागे लपले. त्यांनी आपल्या हातांनी आणि कपड्यांनी आपले चेहरे झाकले.

पण राखेचा ढीग उंच उंच होत गेला. लोक चालू शकले नाही. लोक श्वास घेऊ शकले नाही. लोक राखेच्या खाली अडकले.




राख पडत राहिली.

रस्त्यावर राखेचे ढीग वाढत गेले. राख घरात पसरली. राख पहिल्या मजल्या पर्यंत गेली. राख दुसऱ्या मजल्याच्या खिडकीत सुद्धा जमा झाली.

आता घराच्या आतही लोक फसले.







पण वेसुवियसचे काम अजून पूर्ण झाले नव्हते. मग पहाडावरून विषारी वायूचा एक मोठा ढग बाहेर आला. ढगाने पोम्पेई शहर पूर्ण झाकले.

गरम राख आणि वायूची एक मोठी नदी पहाडाच्या कडेवरून खाली वाहू लागली. नदी शहराच्या भिंतीवरून वाहू लागली.

पोम्पेई शहरात आता कोणीही वाचले नाही.







खाड़ीच्या त्या बाजूला एक मुलगा उभा राहून बघत होता. त्याचे नाव प्लिनी होते.

प्लिनीने वेसुवियसमधून निघालेला विचित्र ढग बघितला. त्याने पोम्पेईवर अंधार होत पडत असतांना बघितले. नंतर त्याने गरम राख, दगड आणि उफाळलेल्या समुद्राबाबत ऐकले.

प्लिनी तो दिवस कधी विसरू शकला का? नाही कधीच नाही.

३ .

जिवंत गाडले!

पोम्पेईवर दोन दिवसापर्यंत राख पडत होती. मग राख पडणे बंद झाली. आता मोठा ढग निघून गेला होता. पहाड़ शांत झाला.

राख थंड झाली आणि कडक झाली. आता राखेतून वर फक्त इमारतीची टोके दिसत होती. पूर्ण शहर जिवंत गाडले गेले होते.

जे लोक बोटीत बसून तिथून गेले त्यांच्यातले काहीजण परत आले. ते आपल्या घरांचा शोध घेत आले होते. ते आपले सामान शोधायला आले होते. ते आपल्या मित्रांचा शोध घेत होते.

पण सगळेकाही राखेच्या खाली दडपले गेले होते. सिलबंद झाले होते.





प्लिनी मोठा झाला. तो मोठा होऊन लेखक झाला. त्याने वेसुवियसमधून निघालेल्या मोठ्या ढगाबद्दल लिहले. त्याने त्या ज्वालामुखीच्या बाबत लिहले ज्यात पोम्पेईचे दफन झाले होते.




अनेक वर्षे गेली. वेसुवियस परत परत फुटला.शहरावर अधिक राख पडली. शेवटी या गोष्टीच्या काहीही खूणा राहिल्या नाहीत की तिथे कधी लोक राहत होते.

हळुहळू लोक, पोम्पेई नावाच्या शहराविषयी पूर्ण विसरून गेले.

शेकडो वर्षानंतर वरची राख मातीत बदलली गेली. तिथे गवत उगवू लागले. लोकांनी गाडले गेलेल्या शहरावर आपली घरे बांधली.


त्यांनी जुन्या पोम्पेईच्या वर एक नवीन शहर बांधले. त्यांना हे ही माहीत नव्हते की जुने शहर त्यांच्या अगदी खाली होते.






मग काही लोकांनी प्लिनीचे लेख वाचले. त्यांनी पोम्पेई नावाच्या एका गाडल्या गेलेल्या शहराच्याबाबत वाचले.

पोम्पेई कुठे होते? कोणालाच माहीत नव्हते.



एक दिवस काही मजूर पाण्यासाठी सुरंग लावत होते. तेव्हा जमिनीच्या खाली एक जुन्या भिंतीचे तुकडे सापडले. परंतु त्यांना हे माहीत नव्हते की भिंत एका शहराचा भाग होती.

काही वर्षांनंतर त्याच ठिकाणी अजून काही लोक उत्खनन करण्यासाठी आले. त्यांना अजून इमारत सापडली. जमिनीच्या खाली एखादे शहर होते का? तेच ते शहर आहे का? ज्याबद्दल प्लिनीने लिहले होते?



तेव्हा खोदतांना एकाला दगड सापडला. त्यावर एक नाव कोरलेले होते. नाव होते पोम्पेई.

लोक खूप उत्साहित झाले. पोम्पेईचे हरवलेले शहर तिथेच होते - त्यांच्या पायाच्या खाली!

जर त्यांनी ते शहर उघडून बघू शकले असते तर त्यांना कल्ले असते की खूप पूर्वी लोक कसे राहत होते?

वैज्ञानिकांनी उत्खनन सुरु केले. त्यांनी हळूहळू आणि खूप काळजीपूर्वक काम केले. त्यांनी अनेक उपकरणाचा उपयोग केला. त्यांनी राख झटकून झाडे बाजूला केली. त्यांना काहीही नष्ट होऊ द्यायचे नव्हते.





वैज्ञानिकांना सोन्याच्या सुंदर बांगड्या सापडल्या.

त्यांना तुटलेली अंडी मिळाली.



त्यांना रंगीत दगडांची चित्रे मिळाली. त्या चित्रांना मोज़ाइक म्हटले जाते.

आणि त्यांना ते लोक सापडले जे मेले होते.

आधी तर वैज्ञानिकांना काहीच खडे मिळाले.



नंतर त्यांना राखेत काही विचित्र अशा भेगा दिसल्या. त्यांनी भेगांमध्ये प्लास्टर टाकले. जेव्हा प्लास्टर वाळले, तेव्हा प्लास्टरचा आकार अगदी माणसासारखा झाला होता.



प्लास्टरच्या साच्यावरून कळले की मेल्यावर लोक कसे दिसतात? एवढेच नाही तर तिथे एक साखळी बांधलेले कुत्रे सुद्‌धा प्लास्टरमध्ये सापडले.





आज पोम्पेईचे जुने शहर छत नसलेले एक विशाल संग्रहालय सारखे आहे.

पोम्पेई इटलीमध्ये आहे. अनेक देशातील लोक इथे फिरायला येतात. ते हजारो वर्षांची जुनी दुकाने आणि घरे बघायची असतात.

आणि ते वेसुवियस पर्वत पण बघायला जातात. वेसुवियस, विश्वातील सगळ्यात प्रसिद्ध ज्वालामुखी आहे.

वैज्ञानिक ज्वालामुखीकडे खूप लक्षपूर्वक बघतात. जमिनीतून किती वायू बाहेर पडतो? ज्यालामुखी जवळचे खडक किती गरम आहेत? धरती किती हलते?





बघा! एक शेतकरी आपल्या द्राक्षांच्या वेलींची काळजी करतो आहे. द्राक्षे वेसुवियस नावाच्या पर्वतावर उगवतात. जवळच एक सरडा गरम खडकावर आराम करत आहे.

पोम्पेईमध्ये हा एक शांतिपूर्ण दिवस आहे.

राक्षस झोपला आहे.

राक्षस परत कधी उठणार?

कोणालाच माहीत नाही.

अंत